


दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता

vadalvartanews@gmail.com

गाव तेथे वार्ताहर
महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हा, तालुका, शहर आणि ग्रामीण भागात
वार्ताहर/पत्रकार आणि जाहिरातदार नेमणे आहेत.
वादळ वार्ता या लोकप्रिय दैनिक वृत्तपत्राकरिता महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हा, तालुका, शहर आणि ग्रामीण भागात प्रतिनिधी नेमणे आहेत. इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा.
दैनिक वादळ वार्ता
जॉईन झालेल्या प्रत्येक प्रतिनिधींना आय कार्ड आणि नियुक्ती पत्र दिले जाईल.
* पात्रता *
समाजसेवेची आवड, जनसंपर्क, फोन असणे आवश्यक ,सोशल मीडियाचा वापर करता येणे
दैनिक वादळ वार्ता
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे एकमेव विभागीय निर्भिड दैनिक
मो.न.9422660077

●मुख्य संपादक : अजय भांगे ●कार्यकारी संपादक : रमेश गुळभिले https://epaper.vadalvarta.com मो.न. ९४२२६६००७७

● बीड/महाराष्ट्र ● गुरूवार ८ ऑगस्ट २०२४ ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष १ ले ● अंक ३५७ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

# आरक्षण बचाव यात्रा समारोपीय सभा संभाजीनगर मध्ये पार पडली. प्रकाश आंबेडकर यांच मोठं विधान

## जरांगेंवर प्रकाश आंबेडकरांची टीका

**मनोज जरांगे यांची मागणी मराठ्यांना ओबीसमधून आरक्षण दिलं पाहिजे, अशी आहे. सागे सोयऱ्यांना आरक्षण द्या असं त्यांचं म्हणणं आहे. याबाबत राजकीय पक्षांनी भूमिका घेण्यापेक्षा समाजाने भूमिका घेतली आहे. आम्ही यात्रा काढली. तेव्हा आम्हाला नावं ठेवली गेली. 40 वर्षांचा मला अनुभव आहे. यात आंबेडकर चळवळीतील बां#X@ समोर असतात. यात पाकिटचे बांडगुळ असतात. जरांगे यांनी म्हटलं निवडणूक लढतो जे राजकीय भांडण राहील सामजिक भांडण होणार नाही, असं प्रकाश आंबेडकर म्हणाले.**
**मुंबई, पुणे, कोल्हापूर याठिकाणी पावसाची परिस्थिती होती. ही यात्रा कशी सफल होईल? यासाठी लोक सहभागी होत होते. आरक्षण हा सामाजिक प्रश्न आहे. त्याला राजकीय रंग लागतं कामा नये. यासाठी आम्ही प्रयत्न करत आहोत. जे जे आरक्षणातील होल्डर छगन भुजबळ आणि कॉँग्रेस इतरांना निमंत्रण दिलं होतं. उद्देश हा होता ही, आरक्षणाबाबत जागृतता यावी...,**

**वादळवार्ता/विशेष**

वंचितचे नेते प्रकाश आंबेडकर यांनी आरक्षण बचाव यात्रा काढली. या यात्रेनिमित्त आंबेडकर आज छत्रपती संभाजीनगरमध्ये होते. त्यावेळी त्यांनी उपस्थितांना संबोधित केलं. यावेळी मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांचं




नाव त्यांनी घेतलं. मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वात दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न केला. ही परिस्थिती का झाली? राजकीय पक्षांनी भूमिका न घेतल्याने झाली. पश्चिम महाराष्ट्र देखील फूट दिसते. याची तीव्रता मराठवाड्यात आहे. इतर जिल्ह्यात देखील आहे. निवडणुकांमध्ये मराठा सामाज आपल्याला दाखवून देईल म्हणतात. हे म्हणतात की आम्ही ओबीसी समाजाला मतदान करणार नाही. ओबीसी म्हणतात ती आम्ही मराठ्यांना मतदान करणार नाही. 14 पासून 29 तारखेपर्यंत मनोज जरांगे भूमिका घेतील असा सांगतायेत. त्यावेळी काय होतं ते पाहू, असं प्रकाश आंबेडकर म्हणाले.



## बीड तालुकाध्यक्ष पदी आनंद लाड यांची निवड महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन संघटना बीड शाखेची तालुका कार्यकारणी निवड संपन्न

**बीड प्रतिनिधी :-**

काल शासकीय विश्रामगृह येथे झालेल्या बैठकीत जिल्हाध्यक्ष विष्णू आडे यांच्या अध्यक्षतेखाली तसेच प्रशांत सुरवसे राज्य समन्वयक यांच्या उपस्थितीत बीड तालुक्याची कार्यकारणी निवडण्यात आली बैठकीचे प्रास्ताविक भूषण टेके सर यांनी केले व सर्वानुमते यामध्ये जिल्हा कार्यकारणी मध्ये काही निवडी करण्यात आल्या बीड तालुकाध्यक्ष पदी श्री आनंद लाड, कार्याध्यक्ष श्री मुकुंद रसाळ, कोषाध्यक्ष अमोल कांबळे, उपाध्यक्ष गणेश लांडगे, प्रसिद्धीप्रमुख शिवाजी मुळे व संघटक प्रदीप गायकवाड अशा निवडी करण्यात आल्या .१७ ऑगस्ट रोजी होणाऱ्या मोर्चा जिल्ह्यातील सर्व कर्मचाऱ्यांनी उपस्थित राहण्याचे आवाहन यावेळी जिल्हाध्यक्ष विष्णू आडे सर यांनी केले. बैठकीचा समारोप जिल्हा प्रवक्ते राहुल उंडाळे सर यांनी केला. वरील निवडीसाठी तालुक्यातील हरीश केदार, भाऊसाहेब मिसाळ, एस आर शिंदे, दिनकर बडे, खामकर श्रीकांत, महेश फसले,भिवराज कोकणे इत्यादी शिलेदारांची उपस्थिती होती.

## ३ लाख ५२ हजार ८८० लाभार्थ्यांनी मुख्यमंत्री: माझी लाडकी बहीण योजनेमध्ये जिल्हयातून अर्ज दाखल

### ९४.३४% अर्जांची छाननी करून स्वीकृती मोबाईल संदेश

**बीड प्रतिनिधी**

बीड, 1 : बीड जिल्ह्यामध्ये आतापर्यंत 3 लाख 52 हजार 880 महिलांनी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण या योजनेमध्ये अर्ज दाखल केले असून 94.34 % टक्के अर्जांची छाननी करून मोबाईलव्दारे स्वीकृती संदेश देण्यात आले आहेत. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेमध्ये लाभार्थी महिलांची नोंदणी आणि अर्जाची पडताळणी करण्याची विशेष मोहीम जिल्हयात सुरू असून याअंतर्गत 3 लाख 52 हजार 880 महिलांनी दाखल केलेल्या अर्जाची छाननी करून 3,32,892 लाभार्थी महिलांच्या अर्जांना स्वीकृती देऊन मोबाईल संदेश पाठविण्यात आलेले असून आजपर्यंत



94.34 %टक्के काम झालेले आहे. ज्यांचा ऑनलाईन अर्ज भरतांना कागदपत्राच्या बाबतीत काही त्रुट्या आढळून आले आहेत. त्यांच्या मोबाईलवर संदेश जात असून अश्या अर्जदार महिलांनी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेअंतर्गत नारी शक्ती दूत ॲपच्या माध्यमातून ज्या मोबाईल ॲप वरून ऑनलाइन अर्ज भरला आहे त्याच मोबाईल मधून अर्ज दुरूस्त (एडिट) करून अर्जाची त्रुटी पूर्तता पूर्ण करून घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे. ज्या महिला अर्जदारांनी अर्जासोबत आवश्यक सर्व कागदपत्रे जोडलेले आहेत त्यांचे अर्ज स्वीकृती देण्यात येत आहे. व तसा संदेश महिला अर्जदारांच्या मोबाईलवर जात आहे स्वीकृती (Approved) असा संदेश आल्यास आपला अर्ज यशस्वीरिता भरला गेला असल्याचे कळते. तथापि ज्या महिला अर्जदारांना आपला अर्ज पार्शली रिजेक्टेड ( partially rejected) असा मोबाईल संदेश आलेला आहे त्यांनी तात्काळ नारी शक्ती दूत ॲपच्या माध्यमातून ज्या मोबाईल ॲप वरून ऑनलाइन अर्ज भरला आहे त्याच मोबाईल ॲप मधून अर्ज एडिट करून अर्जाची त्रुटी पूर्तता पूर्ण करून घ्यावी, असे आवाहन, जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी केले आहे. 00000



**परळी - प्रतिनिधी**

- परळी येथील इंजि. राजू जगतकर यांची दुबई येथील बुलेट ट्रेन मध्ये असिस्टंट मॅनेजर या पदावर निवड झाली आहे. त्या निमित्ताने परळी येथील मिलिंद विद्यालयातील वर्ग मित्रपरिवार यांनी केला सत्कार व पुढील वाटचालीस दिल्या हार्दिक शुभेच्छा...

## भौतिक युगात माणसाला सुखाची प्राप्ती व दुःखाचे निस्सारण व्हावे यासाठी नामसंकिर्तन, भजन, प्रवचन, सत्संग यांची आवश्यकता

### ष.ब्र.१०८ श्री गुरूपादेश्वर शिवाचार्य महाराज यांच्या तपोनुष्ठानात कीर्तनकार शि.भ.प.विश्वनाथ स्वामी पेनुरकर यांचे प्रतिपादन

**परळी वै./प्रतिनिधी**

श्रावण मासाचे औचित्य साधून परळी वैजनाथ येथील पंचम ज्योतिर्लिंग प्रभू वैद्यनाथ मंदिराच्या पायथ्याशी असलेले श्री शनि मंदिर येथे दि.५ ते दि.१७ ऑगस्ट पर्यंत ष.ब्र.१०८ श्री गुरूपादेश्वर शिवाचार्य महाराज यांचे श्रावणमास तपोनुष्ठान व परमरहस्य पारायणास सुरुवात झाली असून सलग १३ दिवस चालणा-या तपोनुष्ठानात परमरहस्य पारायम सोहळ्यास शहर व परिसरातील भाविकांचा उदंड प्रतिसाद मिळत आहे. सोमवार दिनांक ५ ऑगस्ट रोजी उपस्थित भाविक भक्तांशी संवाद साधताना कीर्तनकार शि.भ.प.विश्वनाथ स्वामी पेनुरकर यांनी सांगितले की, .काही ऐसे करावे,सुखाचे



मळे पिकवावे! अमुलाग्र नासून जावे,विघ्न बाधा !! या संतश्रेष्ठ श्री मन्मथ माऊलीच्या उक्तीप्रमाणे भौतिक युगात माणसाला सुखाची प्राप्ती व दुःखाचे निस्सारण व्हावे यासाठी नामसंकिर्तन, भजन,प्रवचन,सत्संग यांची आवश्यकता असल्याचे ते म्हणाले.वसूंधरारत्न डॉ. शिवलिंग शिवाचार्य महाराज अहमदपुरकर यांच्या आशीर्वादाने व प्रेरणेने परळी वैजनाथ येथील पंचम ज्योतिर्लिंग प्रभू वैद्यनाथ मंदिराच्या पायथ्याशी असलेले श्री शनि मंदिर येथे ष.ब्र.१०८ श्री गुरूपादेश्वर शिवाचार्य महाराज यांच्या श्रावणमास तपोनुष्ठानास उत्साहात प्रारंभ झाला आहे. १३ दिवस चालणा-या तपोनुष्ठान सोहळ्यात श्रावणमास तपोनुष्ठान कालावधीत दररोज अन्नप्रसाद, अखंड शिवनाम सप्ताह,परमरहस्य पारायण सोहळा, कीर्तन, प्रवचन, वृक्षदान सोहळा, वृक्षारोपण, जलपुनर्भरण, आरोग्य तपासणी शिबीर, सांस्कृतिक व विविध समाज उपयोगी उपक्रमाचेही आयोजन करण्यात आले आहे.यासोबतच श्रावणमास तपोनुष्ठान सोहळ्या दरम्यान दररोज प्रसादाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. मंगळवार रोजीचा महाप्रसाद कै.मुद्रीकाबाई राम तोंडारे यांच्या स्मरणार्थ डॉ.महादेव राम तोंडारे विरार,मुंबई यांच्यावतीने करण्यात आला. यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते श्री गुरुवर्यांची आरती करण्यात आली याकार्यक्रमास भाविक भक्तांचा मोठा प्रतिसाद लाभत आहे तरी जनकल्याणासाठी आयोजित करण्यात आलेल्या या तपोनुष्ठान, परमरहस्य पारायण सोहळ्याचा शहर व परिसरातील सर्व शिव भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन द्वादश पंचम् ज्योतीर्लिंग प्रभू वैद्यनाथाच्या परळी-वैजनाथ नगरीतील ष.ब्र.१०८ श्री गुरूपादेश्वर शिवाचार्य महाराज यांच्या द्वादश श्रावणमास तपोनुष्ठानाचे वीरशैव लिंगायत समाज व श्रावणमास तपोनुष्ठान समितीच्या पदाधिकार्यांनी केले आहे.

# पुढा-यांनो लाजा वाटु द्या बीड जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या ९८ शाळा ईमारत विरहीत; झाडाखाली, पत्र्याच्या शेडमध्ये, समाज मंदिरात तर किरायाच्या घरात भरतात शाळा:- डॉ.गणेश ढवळे

**बीड प्रतिनिधि**

:- बीड जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या ९८ शाळा ईमारत विरहीत असुन तब्बल १० वर्षापासुन या शाळा झाडाखाली, पत्र्याच्या शेडमध्ये, समाज मंदिरात तर काही ठिकाणी किरायाच्या रूममध्ये भरत आहेत. ग्रामीण भागातील मुलांना शिक्षणासाठी पायाभूत सुविधांचा अभाव असुन शिक्षणावर कोट्यवधींचा खर्च केल्याचा जाहिरातीतुन गाजावाजा करणा-या सरकारला आणि शिक्षण विभागाला याचे गांभीर्य दिसून येत नाही. या शाळांना शाळा इमारतीसाठी निधी देण्यात यावा अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी लेखी निवेदनाद्वारे निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड, शिक्षणाधिकारी ( प्राथमिक) जिल्हा परिषद बीड यांना केली आहे. खरंतर विकासाच्या नावाने बोंबाबोंब करणा-या लोकप्रतिनिधींनों जरा लाज वाटु द्या अशी संतप्त प्रतिक्रिया डॉ.गणेश ढवळे यांनी व्यक्त केली आहे.

शाळेसाठी १० गुंठे जमिन दानपत्र देऊन १० वर्षे झाले अजुन बांधकाम ईमारत नाही:- माधुरी कोटुळे

बीड तालुक्यातील बीड शहरापासुन ८ किलोमीटर अंतरावरील २५० लोकसंख्या असलेल्या कोटुळे वस्ती वर २००३ पासुन वस्ती शाळा असुन तेव्हा पासून १० वर्षे १००० रुपये महिना कंत्राटी तत्वावर काम केलेले आहे.२०१३ पासुन शासनमान्यता मिळालेली आहे.आमचे बंधु काकासाहेब कोटुळे यांनी शाळेसाठी ६ गुंठे जागेचे दानपत्र करून दिलेले आहे.मात्र अद्याप शाळेसाठी इमारत बांधकाम करण्यात आलेले नाही.असे वस्ती शाळेवरील सहशिक्षिका माधुरी कोटुळे यांनी सांगितले.

इमारतीसाठी शिक्षण विभागाकडे पाठपुरावा:- गणेश ढाकणे, मुख्याध्यापक

जुन २०२३ पासुन कोटुळे वस्तीवर कार्यरत असुन बीड शहरातील केंद्रीय शाळा धोंडीपुरा अंतर्गत कोटुळे वस्ती शाळेला इमारत नाही.पत्र्याच्या शेडमध्ये मुलांना जागा पुरत नाही. झाडाखाली शाळा भरवावी लागते.सध्या विद्यार्थी पटसंख्या ३४ असुन शाळेतील असुविधा विषयी शिक्षण विभागाला कळवण्यात आले आहे. परंतु अद्याप ईमारती साठी निधी मिळालेला नाही. असे मुख्याध्यापक गणेश ढाकणे यांनी सांगितले.

वादळवारा, पावसाळ्यात लेकरांची काळजी वाटते:- मनिषा कोटुळे ( पालक)

शाळेला पक्की इमारत नाही . झाडाखाली , पाऊस आल्यावर पत्र्याच्या शेडमध्ये लेकरं बसतेत नाहीतर.पावसाळ्यात वादळवारा त्यामुळे लेकरांची काळजी वाटते त्यामुळे सरकारने पक्का ईमारतीची सोय करावी अशी मागणी पालक मनिषा कोटुळे, बिभीषण कोटुळे यांनी केली आहे.

बीड जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या ९८ शाळा ईमारत विना

बीड जिल्ह्यातील बीड तालुक्यातील २८, केज तालुक्यातील १७, परळी तालुक्यातील १२, माजलगाव तालुक्यातील ११,गेवराई



तालुक्यातील ११,अंबेजोगाई तालुक्यातील ६, शिरूर तालुक्यातील ५, पाटोदा तालुक्यातील ३, धारूर तालुक्यातील ३, आष्टी आणि वडवणी तालुक्यातील प्रत्येकी१ अशा एकुण ९८ जिल्हा परिषद वस्ती शाळा इमारत विना असुन आष्टी तालुक्यातील जि.प.प.प्रा.शा.खेडकर गोठे, अंबेजोगाई तालुक्यातील एकुण ६ ( चनई तांडा, बरड वस्ती,लोखंडी सावरगाव विट भट्टी परीसर दवाखाना , भीमाई वस्ती,उघडे वस्ती वरवंटी, कुसळवाडी तांडा नं .२.बीड तालुक्यातील २८ (गवळवस्ती खापर पांगरी, आसराई वस्ती नाळवंडी, पवार वस्ती काळेगाव,खांडे वस्ती म्हाळसजवळा,मस्कर वस्ती सुर्याची वाडी,खोले वस्ती आहेर धानोरा,कोटुळे वस्ती वरवटी, घुमरे वस्ती वरवटी, आगम वस्ती पिंपरगव्हाण,बारकुल वस्ती गौळवाडी, खांडेकर वस्ती पाली, इस्मालेदरा वस्ती पाली, जगताप वस्ती कर्झणी,गौळी वस्ती पालदरा,बोरबन वस्ती पिंपळवाडी,तांबारे वस्ती साक्षाळपिंप्री,हिंगे वस्ती साक्षाळपिंप्री,नरनाळे वस्ती इट,माने वस्ती लिंबा,बेलगाव वस्ती बेलगाव, विठ्ठलवाडी नागझरी, मुंडे वस्ती ताडसोन्ना,क्रांती वस्ती ताडसोन्ना, जाधववस्ती वांगी, महादेव दरा तांडा मैंदा, मुंडे वस्ती बोरदेवी, सानप वस्ती रूद्रापुर .धारूर तालुक्यातील ३ (आनंद नगर,संचगाणी तांडा,खोडस तांडा).केज तालुक्यातील १७ ( यमाई वस्ती,चिंचकर वस्ती,डांगे वस्ती, विठ्ठल वस्ती,येडका वस्ती,गदळे वस्ती, हनुमान वस्ती, हनुमान वस्ती तुकाचीवाडी, गजानन नगर, विठ्ठल नगर वस्ती, भालगाव नं १ ऊर्दू, चिंचोली माळी ऊर्दू, मेटे वस्ती,घाटे वस्ती,सोनदरा वस्ती,हरगड वस्ती,लहुरी ऊर्दू .गेवराई तालुक्यातील ११ ( मोरे वस्ती राजपिंपरी, शेंबडे वस्ती शेकटा, गदाडे वस्ती शेकटा, हनुमान नगर धुमेगाव,नालसाहेब वस्ती नंदपुर, काटकर वस्ती कुंभार वाडी, लक्ष्मण वस्ती खडकी, शिंदे वस्ती खडकी, धनगर वस्ती गाडेवाडी,अंकोटा ,देवीतांडा तलवडा,.परळी तालुक्यातील १२ ( सारडाव वस्ती, डाव वस्ती धर्मापरी, मणियार धर्मापरी, महादेव वस्ती, जांभुळ दरा तांडा, शिवाजीनगर सिरसाळा, विट भट्टी सिरसाळा,रायणार सिरसाळा,नेहरू नगर सिरसाळा, राधानगर सिरसाळा,हेमा नाईक तांडा,महोदरा तांडा .पाटोदा तालुक्यातील ३ (भांगे वस्ती,टोकवाड वस्ती,तांबे वस्ती).शिरूर तालुक्यातील ५ ( महात्मा फुले नगर, विठ्ठल वस्ती, शिंदे वस्ती झापेवाडी,पांढरे वस्ती शिंगारवाडी, रूताळे वस्ती . वडवणी तालुक्यातील १ वंजारवाडी वस्ती .माजलगाव तालुक्यातील ११ ( हनुमान नगर तांडा, राठोड वस्ती,येला तांडा, इंदिरा नगर राजेगाव, अहिल्या नगर, माऊली वसाहत, झोपडपट्टी वारोळा,नाईक नगर, झुंझुर्डी तांडा,नागडगाव तांडा, हनुमान नगर टाकरवण एकुण ९८ जिल्हा परिषदेच्या शाळा ईमारत विरहीत आहेत.

डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर
मो.नं.८१८०९२७५७२

# संभाजी ब्रिगेडची ९ तारखेला बैठक

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट

नांदेड : संभाजी ब्रिगेडच्या सर्व जिल्हा पदाधिकारी तालुका अध्यक्ष,तालुका पदाधिकारी कार्यकर्ते विधानसभा इच्छुक उमेदवार यांची शुक्रवार दि.९-ऑगस्ट रोजी शासकीय विश्रामगृह नांदेड येथे दुपारी १२ वाजता बैठक होणार आहे.

संभाजी ब्रिगेडचा २३-ऑगस्ट रोजी पुणे येथे होणाऱ्या जागर लोकशाहीचा विचार स्वराज्याचा जागर लोकशाहीचा महामेळावा होणार असुन त्याच्या तयारीचा आढावा,आगामी विधानसभा निवडणुक मतदारसंघ निहाय आढावा घेण्यासाठी संभाजी ब्रिगेड प्रदेश संघटक तथा नांदेड जिल्हा संपर्क प्रमुख उमाकांत उफाडे नांदेड दौऱ्यावर येत असुन त्यांच्या प्रमुख उपस्थितीत संभाजी ब्रिगेड नांदेड जिल्हा बैठक आयोजित करण्यात येत आहे.या बैठकीस संभाजी ब्रिगेडचे विभागीय अध्यक्ष संकेत पाटील यांचे मार्गदर्शन होणार आहे. तरी सर्व जिल्हा पदाधिकारी, तालुकाध्यक्ष,तालुका पदाधिकारी,सर्कल अध्यक्ष,इच्छुक उमेद्वार यांनी लेखी स्वरूपात अहवाल आणावा असे आवाहन संभाजी ब्रिगेड जिल्हाध्यक्ष सुभाष कोल्हे, संभाजी ब्रिगेड जिल्हाध्यक्ष परमेश्वर पाटील, संभाजी ब्रिगेड जिल्हाध्यक्ष भगवान कदम आदिंनी केले आहे.

# महावितरण हे एक कुटुंब आहे- देशपांडे

**यवता/प्रतिनिधी**

केज येथील महावितरण उप विभागीय कार्यालयाचे उप कार्यकारी अभियंता,समीर देशपांडे यांना पदोन्नती बढती मिळाली असल्याने ते बीड येथे अतिरिक्त कार्यकारी अभियंता पदावर नव्याने रुजू झाल्याने त्यांना केज महावितरण कार्यालयातील सर्व कर्मचारी यांनी निरोप समारंभ देत त्यांचा हृदय सत्कार करण्यात आला सत्कारमूर्ती श्री. समीर देशपांडे हे भाऊक होऊन म्हणाले केज मध्ये एक वर्ष सेवा कशी झाली हे कळालेच नाही. सुरुवातीला बीडला रुजू व्हावे की नाही वाटत होते.आपण महावितरण मध्ये कायम काम करतो हे आपले सर्वांचे भाग्य आहे आपण लोकांच्या भावना ठेवून लोकांची कामे केली पाहिजेत,सर्वांनी एकजुटीने राहिले पाहिजे अनेक वेळा वेगवेगळ्या योजना राबवू शकलो,महावितरण हे एक कुटूंब आहे आणि



तुम्हा सर्वांच्या सहकार्यामुळेच चांगले काम करण्याची संधी मिळाली,असे भावनिक उद्गागार देशपांडे यांनी काढले कार्यक्रमाचे अध्यक्ष साहाय्य अभियंता,महेश अंडील हे होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शंकर ठोंबरे यांनी केले. कार्यक्रमास सहाय्यक अभियंता वैभव चव्हाण,सहायक अभियंता शहाणे,गुत्तेदार वळसे पाटील, मागासवर्गीय संघटनेचे केज तालुका अध्यक्ष शिवाजी घुले, तसेच कर्मचारी नांदवे, सोनवणे, चाळक,काळे,बारगजे,तेलंग, नाईकवाडे,इत्यादी उपस्थित होते.

### पक्षाने संधी दिल्यास बिलोली विधानसभा निवडणुक

# लढण्यास इच्छुक १०८ विरूपाक्ष शिवाचार्य महाराज मुखेडकर



नायगाव /हानुमंत चंदनकर


देगलूर बिलोली विधानसभा मतदारसंघातील अनेक कामे प्रलंबित असून शेतकऱ्यांचे अनेक समस्या, तरुणाची बेरोजगारी तरुणाची वाढती बेरोजगारी, शेतीमालांना हमी पूर्ण भाव नाही, अनेक ठिकाणी रस्ते वीज, पाणी, अशा अनेक समस्या आहेत जनतेच्या प्रश्नाला वाचा फोडण्यासाठी व जनतेचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी पक्षाने संधी दिल्यास मी तत्पर आहे व देगलूर बिलोली मतदारसंघातील कार्यकर्ते हितचिंतक कामाला लागली असून आमच्या मठामध्ये येऊन असंख्य भक्त व विविध संघटनेतील पदाधिकारी विविध क्षेत्रात काम करणारे कार्यकर्ते यासह समाजातील नागरिकांनी येऊन आपण उभे राहावी अशी मागणी सध्या जोर धरत असल्याने पक्षाने संधी दिल्यास मी इच्छुक आहे अशा प्रतिक्रिया पत्रकारांशी संवाद साधताना मुखेड मठाचे मठाधिपती विद्या विभूषित पंडित १०८ वीरूपाक्ष शिवाचार्य महाराज मुखेडकर यांनी पत्रकारांशी संवाद साधला

# अभिजित मुजमुले याची सर्व सामान्य कुटुंबातून यशाला गवसणी

### भूमी अभिलेख विभागात अभिलेखापाल पदी निवड

**केज/प्रतिनिधी**

तालुक्यातील मौजे नायगांव येथील अभिजित महादेव मुजमुले याची भूमी अभिलेख विभागात रायगड जिल्ह्यातील कर्जत येथे अभिलेखापाल या पदासाठी निवड झाली आहे.त्याच्या या निवडीबद्दल सर्वच स्तरामधून त्याच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.



अभिजित मुळातच होतकरु असल्याने स्पर्धा परीक्षेत सातत्य राखत शासकीय सेवेचे त्याचे स्वप्न साकार झाले. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतुन सर्वसामान्य कुटुंबातून मेहनतीने हे यश मिळवले. त्याचे प्राथमिक शिक्षण गावातीलच जिल्हा परिषद प्राथमिक शाळा येथे तर पॉलीटेकनिकचे शिक्षण योगेश्वरी कॉलेज अंबाजोगाई आणि सिव्हिल इंजिनियरिंग-बी टेक हे अहमदपूर येथे पुर्ण झाले.मात्र शिक्षण पुर्ण झाले परंतु मनातील शासकीय सेवेचे स्वप्न शांत बसू देत नव्हते. त्यामुळे २०२३ पासून स्पर्धा परीक्षेचा अभ्यास सुरु केला, त्याने अभ्यासातील चिकाटी आणि जिद्द न सोडता सातत्यपूर्ण अभ्यास करत भूमी अभिलेख विभागाकडून घेण्यात आलेल्या परीक्षेत अभिलेखापाल पदी त्याची निवड झाली. अभिजीतने हे यश आपल्या अभ्यासातील सातत्य, चिकाटी आणि जिद्दीवर मिळवले आहे. त्याच्या या यशाबद्दल त्याचे आप्तेष्ट, नातेवाईक, मित्र यांच्याकडून अभिनंदन आणि शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.ते पत्रकार दत्तात्रय मुजमुले यांचे लहान बंधू आहेत.

# अखेर दासखेड,कुसळंब प्राथमिक आरोग्य केंद्रात बाह्यरुग्ण विभाग सुरू

**बीड/प्रतिनिधी**

बीड:- पाटोदा तालुक्यातील दासखेड येथील प्राथमिक आरोग्य केंद्र मुख्य इमारतीसाठी २ कोटी ६३ लाख आणि कुसळंब प्राथमिक आरोग्य केंद्र मुख्य इमारत आणि वैद्यकीय अधिकारी आणि कर्मचारी यांच्या निवासस्थाना साठी ६ कोटी ३१ लाख रुपये खर्चून सर्व सोयींनी युक्त आरोग्य केंद्र बांधण्यात आली होती.मात्र २ वर्षांपासून बांधकाम पूर्ण झालेले असतानाही शासनाच्या लालफितीत आणि लोकप्रतिनिधींनी दुर्लक्ष केल्याने उद्घाटनाच्या प्रतीक्षेत होते. मात्र पंचक्रोशीतील गोरगरीब, कष्टकरी आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकातील रूग्णांची हेळसांड होत असुन त्यांना आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत असुन याबाबत सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी प्राथमिक आरोग्य केंद्रे तातडीने सुरू करण्यात यावीत यासाठी दि.१५ ऑगस्ट आगस्ट रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन करण्यात येणार असल्याचे निवेदन डॉ.सरिता हजारे सहसंचालक आरोग्य सेवा (प्राआकें/उपकेंद्र/दवाखाने) मुंबई यांनी घेत जिल्हा आरोग्य आधिकारी बीड डॉ.उल्हास गंडाळ यांना दिले होते. त्या अनुषंगाने डॉ.उल्हास गंडाळ यांच्या आदेशाने दि.१ ऑगस्ट पासुन दासखेड आणि कुसळंब येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात बाह्यरुग्ण विभाग सुरू करण्यात आला असुन रूग्णांची गैरसोय दूर झाली असुन पाटोदा येथे उपचारासाठी आर्थिक भुर्दंड सहन करावा लागणार नाही.

प्राथमिक आरोग्य केंद्र सुरू झाल्याने रूग्णांची हेळसांड थांबणार ; पिण्याचे पाणी आणि विजेची सोय करावी :- प्रविण शिंदे (दासखेड )

दासखेड येथील भुमिपुत्र कृष्णा जाधव हे मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांचे विश्वासू अधिकारी असुन एकनाथ शिंदे आरोग्यमंत्री असताना कृष्णा जाधव ओ.एस.डी. म्हणून काम पहात होते.त्यांच्या प्रयत्नांमुळे दासखेड येथे प्राथमिक आरोग्य केंद्र मंजूर करण्यात येऊन २ कोटी ६३ लाख खर्चून ईमारत बांधण्यात आली मात्र २ वर्षांपासून आरोग्य सुविधा सुरू नव्हती.आता आरोग्य सुविधा सुरू झाल्याने पंचक्रोशीतील रूग्णांची हेळसांड थांबणार आहे. याठिकाणी पिण्याच्या पाण्याची आणि विजेची सोय नाही तेवढ्या त्रुटी आरोग्य विभागाने दुर कराव्यात.

अखेर दासखेड येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात आरोग्य सुविधा सुरू

दासखेड येथील प्राथमिक आरोग्य केंद्र तब्बल २ कोटी ६३ लाग रूपये खर्चून मुख्य ईमारत सर्व सोयींनी युक्त बांधण्यात आली होती.मात्र २ वर्षांपासून शासनाच्या लालफितीत आणि लोकप्रतिनिधींनी दुर्लक्ष केल्याने उद्घाटनाच्या प्रतीक्षेत होते.संबधित प्रकरणी १५ ऑगस्ट रोजी आंदोलनाचा ईशारा दिल्यानंतर डॉ.सारिका हजारे सहसंचालक आरोग्यसेवा ( प्राआकें/ उपकेंद्र/ दवाखाने) मुंबई यांनी निवेदनाची दखल घेऊन प्राथमिक आरोग्य केंद्र सुरू करण्याच्या सुचना दिल्यानंतर डॉ.उल्हास गंडाळ यांच्या आदेशाने दासखेड आणि कुसळंब येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात बाह्यरुग्ण सेवा सुरू करण्यात आली असुन वैद्यकीय अधिकारी डॉ.शरयु पडोळे कार्यरत असुन रूग्णांना आरोग्य सेवा देत आहेत.

आवश्यक पदभरती झाली असुन बाह्यरुग्ण विभाग सुरू :- डॉ.उल्हास गंडाळ ; जिल्हा आरोग्य अधिकारी बीड

दासखेड आणि कुसळंब प्राथमिक आरोग्य केंद्रात वैद्यकीय अधिकारी आणि आरोग्य सहाय्यकांची दोन पदे भरलेली आहेत. क्लार्क ,एएनएम, सफाई कामगार अशा स्वरूपाचा कर्मचारी वर्ग बाह्य स्त्रोताकडुन भरण्यात आलेला असुन दि.१ ऑगस्ट पासुन दोन्ही केंद्रातील बाह्यरुग्ण विभाग सुरू करण्यात आलेला असुन पुढील सुविधा लवकरच उपलब्ध करून देण्यात येतील.

# महसूल पंधरवाडानिमित्त विविध उपक्रम

**विशेष | प्रतिनिधी**

मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेबद्दल दिली माहिती

बीड, दि. 7 : महसूल पंधरवडा शुभारंभ निमित्ताने मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना शिबिर पट्टीवडगाव ता. अंबाजोगाई येथे आयोजित करण्यात आला असून सदर शिबिरात उपविभागीय अधिकारी अंबाजोगाई दिपक वजाळे, विलास तंरगे तहसिलदार, गटविकास अधिकारी अंबाजोगाई व ग्रामस्थ आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण उपक्रम संपन्न

महसूल पंधरवडा निमित्ताने मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना या उपक्रमात औद्योगिक प्रशिक्षण संस्था अंबाजोगाई येथे मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेचा लाभ अधिकाधिक विद्यार्थ्यांना घेता यावा यासाठी महसूल विभागामार्फत देण्यात येणाऱ्या प्रमाणपत्राचे शिबिर आयोजित करून प्रमाणपत्रासाठी आवश्यक कागदपत्रांची माहितीपत्रक सर्व विद्यार्थ्यांना देण्यात आले. तसेच विद्यार्थ्यांना सदर योजनेची परिपूर्ण माहिती दिली.

अंबाजोगाई येथे श्री योगेश्वरी महाविद्यालयामध्ये युवकांशी संवाद साधण्यात आला. महसूल विभागामार्फत राबवण्यात येणाऱ्या विविध योजनांचे माहितीपत्रक याप्रसंगी युवकांना वाटण्यात आले. तसेच मतदार नोंदणी बाबत जागृती करण्यात आली.

अंबाजोगाई येथे शेती, पाऊस आणि दाखले उपक्रम राबविण्यात आला

महसूल पंधरवाडा अंतर्गत तहसील कार्यालय अंबाजोगाई येथे शेती पाऊस आणि दाखले हा उपक्रम राबविण्यात आला. या नैसर्गिक आपत्तीने बाधित नागरिकांना/पशुपालकांना शासन तरतुदीनुसार देय सानुग्रह अनुदान मंजुरी आदेश वितरीत करण्यात आले. तसेच पुरवठा विभागामार्फत इ रेशन कार्ड वाटप करण्यात आले. या विशेष मोहिमेमध्ये शासनाने पुर्व मान्सून व मान्सुन कालावधीत अवकाळी पाऊस/अतिवृष्टी/



पूर यामुळे बाधित झालेल्या नागरिकांच्या घराचे शेतीचे / फळबागांचे जनावरांचे झालेल्या नुकसानीबाबत, आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ मधील तरतुदीनुसार, बाधीत नागरिकांना देय असलेल्या सोई सुविध, नुकसान भरपाई देण्यात आली आहे किवा कसे, याबाबत सर्व कार्यालयीन आढावा घेऊन पात्र नागरिकांना लाभ देण्याबाबतची कार्यवाही करण्यात यावी, असे अपेक्षित असून ते जिल्हयात करण्यात आले आहे. यासह खरिप हंगामामध्ये घेण्यात येणा-या पिकांचे विमा उतरविण्याकरिता, अर्जदाराच्या मागणीनुसार, पिक पेरा अहवाल, सात बाग व 8-अ असे तलाठी स्तरावरुन देय असलेले विविध दाखले देण्यात आलेले किंवा कसे, याबाबतचा आढावा घेऊन प्रलंबित असलेले दाखले संबंधिताना तात्काळ प्रदान करण्यात यावे असे निर्देश प्राप्त झाले होते. त्या प्रमाणे जिल्हयातील तालुकांमध्ये उपक्रम राबविण्यात येत आहे.

कृषी मार्गदर्शन कार्यक्रम

महसूल पंधरवडा अंतर्गत कृषी मार्गदर्शन कार्यक्रम मौजे सनगाव तालुका अंबाजोगाई येथे आयोजित करून सदर कार्यक्रमास परभणी कृषी विद्यापीठाचे व्याख्याते श्री सूर्यवंशी यांनी उपस्थित शेतकरी यांना पिकावरील होणाऱ्या रोगराई व त्यावरील उपाय याबाबत मार्गदर्शन केले. तसेच तालुका कृषी अधिकारी अंबाजोगाई यांनी शासनामार्फत शेतकऱ्यांसाठी राबविल्या जाणाऱ्या योजनांची माहिती दिली तसेच उपस्थित आमच्या शेतीविषयक अडचणी विचारून घेऊ त्याबाबत काय उपाययोजना करावी याबाबत चर्चा झाली.

# प्रमोद पोहरकर यांना जिवन गौरव व महाराष्ट्र भूषण पूरष्कार घोषीत

**नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट**

नांदेड-किनवट : तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष तथा देशोन्नतीचे शहर प्रतिनिधी प्रमोद अण्णासाहेब पोहरकर यांना महात्मा कबीर समता परिषदेचा महाराष्ट्र भूषण व जीवन गौरव पुरस्कारासाठी निवड झाली आहे हा पुरस्कार १४- ऑगस्ट रोजी नांदेड येथे एका विशेष कार्यक्रमात देण्यात येणार आहे अशा आशयाचे पत्र कबीर, समता परिषदेचे संस्थापक अध्यक्ष डॉक्टर मुकुंदराज पाटील यांनी दिले आहे. राजकीय सामाजिक शैक्षणिक पत्रकारिता अशा विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना महात्मा कबीर समता परिषदेच्या वतीने दरवर्षी विविध पुरस्कार देऊन गौरविण्यात येऊन त्यांचा सन्मान ही एका विशेष कार्यक्रमात केला जातो लवकरच पुरस्कार वितरण सोहळा नांदेड येथे आयोजित करण्यात येणार आहे या कार्यक्रमात किनवट तालुका पत्रकार संघाचे तालुका अध्यक्ष तथा देशोन्नतीचे प्रमोद पोहरकर यांना महाराष्ट्र भूषण व जीवनगौरव व पुरस्कार व मानपत्र देऊन सन्मान केला जाणार आहे पत्रकारीते सोबतच त्यांनी सामाजिक कार्याचा वसा हाती घेतलेला आहे ते भारतीय सैन्य दलात त्यांनी नोकरी करित देश सेवा ही केली विविध सामाजिक कार्यात ही पोहरकर सदैव अग्रेसर असतात एकूण त्यांच्या कार्याची दखल घेऊन महात्मा कबीर समता परिषदेने त्यांना महाराष्ट्र भूषण व जीवनगौरव पुरस्कार देऊन सन्मानीत केले जाणार आहे त्यांच्या या निवडीवर विविध क्षेत्रातील मान्यवर आणि किनवट माहूर तालुक्यातील पत्रकार बांधवांनी प्रमोद पोहरकर यांचे अभिनंदन केले आहे.

# केंद्रिय अर्थसंकल्पात महाराष्ट्राला भरीव मदत मिळाली, विरोधकांची बोंबाबोंब! राजकिय स्वार्थापोटी, हिंमत असेल तर उघडा डोळे, बघा निट-प्रवक्ता राम

**बीड/प्रतिनिधी**
केंद्र सरकारने सादर केलेल्या अर्थसंकल्पात महाराष्ट्राला एक लाख कोटी रूपये मिळाल्याचा दावा भाजपाचे प्रदेश प्रवक्ते राम कुलकर्णी यांनी केला असुन काहीच मिळालं नाही असं म्हणत विरोधक केवळ राजकिय स्वार्थापोटी ओरड करत असल्याची टिका त्यांनी केली. वाढवण बंदराला ७६ हजार कोटी तर रेल्वे प्रकल्पासाठी १५ हजार कोटी एवढेच नव्हे तर मराठवाड्यातले सिंचन प्रकल्प पुर्ण करण्यासाठी ६०० कोटी रूपायाची आर्थिक तरतुद असल्याचे सांगत उघडा डोळे, बघा निट असं म्हणत विरोधकांना त्यांनी टोला मारला. केंद्र सरकारने सादर केलेल्या अर्थसंकल्पावर सविस्तर बोलण्यासाठी प्रदेश प्रवक्ते राम कुलकर्णी यांची पत्रकार परिषद पक्षाच्या संघर्ष योद्धा जनसंपर्क कार्यालयात आयोजित करण्यात आली होती. यावेळी भाजपाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के,ओम प्रकाश गिरी यांची उपस्थिती होती. केंद्र सरकारने सामान्य माणसाचं हित आणि देशातील प्रत्येक घटकाचा विचार केला. उत्पादन वाढ करताना गरिब माणसाचा विचार ज्यामध्ये प्रधानमंत्री आवास योजनेतुन एक कोटी घरं, गरिबाच्या मुलांनी शिक्षणात पुढे गेले पाहिजे यासाठी नाममात्र व्याजदरावर दहा लाखाचं कर्ज, आयकरामध्ये नोकरदारांच्यासाठी चांगला निर्णय एवढेच नव्हे तर देशातील राज्य सरकारला पंधरा वर्षासाठी बिनव्याजी कर्ज देणार याचाच अर्थ विकास योजना राबवण्यासाठी प्रोत्साहन देणार. सामान्य लोकांच्या आरोग्य रक्षणासाठी कॅन्सरसारख्या रोगावरील औषधांच्या किमती कमी केल्या तर




हिंदु, बौद्ध, जैन धर्मस्थळांचा विकास करण्यासाठी आर्थिक तरतुद केली. बेरोजगारी हटवण्यासाठी देशातील युवकांना कौशल्य विकास उपक्रम हाती घेवुन रोजगार निर्मिती कशी करता येईल हा विचार देखील यात आहे. स्पर्धेच्या युगात इलेक्ट्रॉनिक वहाने, सौरऊर्जा त्यासाठी दिलेली सवलत एवढेच नव्हे तर देशातील शेतकऱ्यांचे उत्पादन वाढले पाहिजे त्या दृष्टीने शेतीपुरक योजना राबवणे असतील किंवा अवजाराच्या किंमती स्थिर ठेवणे असेल या गोष्टीला प्राधान्य दिलं. अनेक वस्तुवरील कस्टम ड्युटी कमी केल्याचा परिणाम सोन्या चांदीचे भाव कालच पाच हजारांनी उतरले. संरक्षण किंवा इतर देशातील मुलभुत सुविधा यासाठीही कोट्यावधी रूपये आर्थिक तरतुद करण्यात आली. आपल्या देशाच्या भविष्यावरही मोठी गुंतवणुक करणारा अर्थसंकल्प ज्यामध्ये शेतकरी, महिला, युवा, गरिब चार घटक वर्ग डोळ्यासमोर ठेवले. तरूणांच्यासाठी केंद्र सरकारही आता अ‍ॅप्रेंटिस योजना हाती घेणार आहे. १०० नविन क्लस्टर तयार करण्याचा घेतलेला निर्णय ज्यामध्ये उत्पादन, आयटी सेवा या सर्व क्षेत्रात रोजगार उपलब्ध होईल. विरोधक महाराष्ट्राला काहीच मिळालं नाही म्हणून केवळ राजकिय स्वार्थापोटी खोटं बोलत आमच्या विरोधकांनी सुरू केलेला तमाशा बिनपैशाचा असुन एक कोटी पेक्षा जास्त महाराष्ट्राला निधी मिळाला. तरी एक रूपाया मिळाला नसल्याची ओरड विरोधक केवळ बदनामीसाठी करत असल्याचा टोला त्यांनी लगावला. मुंबई, पुणे-नागपूर मेट्रोसाठी २४०० कोटी रूपये, इंडस्ट्रिअल कोरीडॉर ४९९ कोटी, नागरी वाहतुक प्रकल्पासाठी ९०८ कोटी, ग्रीन अर्बन मोबिलिटी प्रोजेक्ट १५० कोटी, नदी पुनर्विकास ५०० कोटी, मुळा-मुठा नदी पुनर्विकास ६९० कोटी, ग्रामीण रस्ते ४०० कोटी, सर्व समावेशक इकॉनिमिक कोरीडॉर ४६६ कोटी, आरोग्य सेवा आणि पोषण आहार ३२०० कोटी, प्रधानमंत्री आवास योजनेसाठी २५०० कोटी मंजुर इतर सुविधांना देखील करोडो रूपये मंजुर केले. तरी सुद्धा विरोधकांची बोंबाबोंब राजकिय स्वार्थापोटी असल्याची टिका कुलकर्णी यांनी पत्रकार परिषदेत बोलताना केली.

# पाटोदा येथून परळी, गंगाखेड, नांदेड कडे जाणाऱ्या सर्व बस गाड्या चाकरवाडी फाटा या ठिकाणी थांबवण्यात याव्या-नगरसेवक सतीश घोलप

**पाटोदा । प्रतिनिधी**
पाटोदा येथून परळी, गंगाखेड, नांदेड कडे जाणाऱ्या सर्व बस गाड्या चाकरवाडी फाटा या ठिकाणी थांबवण्यात याव्यात अशी मागणी पाटोदा नगर पंचायतचे नगरसेवक सतीश घोलप यांनी निवेदनाद्वारे पाटोदा आगार प्रमुख यांच्या कडे केली आहे. सतीश घोलप यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की चाकरवाडी हे विसाव्या शतकातील महान संत माऊली महाराज यांचे मोठे धार्मिक स्थान असून या ठिकाणी संपूर्ण राज्यातून भाविक भक्त दर्शनासाठी येतात. तसेच आपल्या पाटोदा परिसरातून देखील प्रत्येक महिन्याला अमावस्याला यात्रा त्याच प्रमाणे दररोज देखील हजारो भाविक चाकरवाडीला दर्शनासाठी जातात. सध्या श्रावण मास सुरू असून हिंदू धर्मियांच्या या पवित्र महिन्यात मोठ्या संख्येने भाविक भक्त चाकरवाडी येथे माऊली महाराजांच्या समाधी दर्शनासाठी जातात पाटोदा येथून पाटोदा आगाराच्या तसेच इतर आगारांच्या ज्या बस गाड्या परळी, अंबाजोगाई, केज, गंगाखेड, नांदेड या मार्गावर जातात त्यातील अनेक गाड्या भाविकांनी विनंती केली तरी देखील चाकरवाडी फाटा या ठिकाणी थांबत नाहीत या गाड्या पुढे चार पाच किलोमीटर अंतरावर असलेल्या येळंब (घाट) या ठिकाणी थांबतात परंतु एवढे मोठे धार्मिक महत्त्व असलेल्या चाकरवाडी फाट्यावर गाड्या थांबवण्यास चालक व वाहक भाविकांना नकार देतात. त्या मुळे महिला वयोवृद्ध भाविकांचे प्रचंड मोठे



हाल होतात या संदर्भात आपण किमान पाटोदा डेपोच्या सर्व गाड्या चाकरवाडी फाट्यावर थांबतील असे आदेश काढावेत. त्याच प्रमाणे पाटोदा मार्गे जाणाऱ्या इतर आगारांच्या चालक, वाहक यांना देखील आपण सूचना देऊन चाकरवाडी फाट्यावर या गाड्या थांबवण्यासाठी आदेशित करावे. श्रावण महिना हा हिंदू धर्मियांसाठी पवित्र असून या महिन्यात भाविकांची होणारी गैरसोय थांबवावी. या निवेदनावर काही कार्यवाही न झाल्यास हा भाविक भक्तांचा अपमान समजून तिव्र आंदोलन करण्यात येईल असा ईशारा नगरसेवक सतीश घोलप यांनी दिला आहे.

## पालघर जिल्ह्यातील लालठाणे आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना अन्नातून विषबाधा

विक्रमगड प्रतिनिधी



पालघर जिल्ह्यातील शासकीय माध्यमिक आश्रमशाळा लालठाणे येथे इ.५ ते १० पर्यंत शाळा असून एकूण २४४ मुलं शिक्षण घेत असुन ५ तारखेच्या रात्री आलेल्या जेवणातून १२ विद्यार्थ्यांची प्रकृती बिघडल्याने सदर विद्यार्थ्यांना तात्काळ प्रा.आ. केंद्र सफाळे येथे दाखल करण्यात आले असता दिवसभराअखेर त्यांची प्रकृती स्थिर झाली असून सदर विषबाधा ही रात्रींच्या जेवणातुन झाली असावी असा प्राथमिक अंदाज डॉक्टरांकडुन वर्तविण्यात आला असुन विद्यार्थ्यांना विचारले असता रात्रीचे अन्न कडु लागत होते असे त्यांनी सांगितले. हे जेवण मध्यवर्ती स्वयंपाक गृह कांबळगाव येथे तयार करून नंतर तेथुन ते आश्रमशाळेत पोहोचविले जाते.

# जे एन पी ए रोडवर अपघात एकाचा मृत्यू, दोघे जखमी

**उरण/विठ्ठल ममताबादे**
करळ फाटा ते जे एन पी ए या मार्गावर नागरिकांची रहदारी सुरक्षित पणे होण्यासाठी, अनेक उड्डाण पुल बांधण्यात आले आहेत तरीही ट्रेलर च्या बेशिस्त वाहतुकीमुळे उरण परिसरात अपघातांचे प्रमाण काही केल्या कमी होत नाहीत. मग तो दास्तान ते दिघोडे चिरनेर मार्ग असो वा खोपटा ते उरण रस्ता असो अपघातांचे सातत्य चालूच आहे.




आज दिनांक ७ रोजी जे एन पी ए रोडवरील पी यु बी न्हावा शेवा कस्टम ऑफिस नजिकच्या रोडवर सकाळी सात वाजण्याच्या च्या सुमारास रिक्षा व ट्रेलर चा भिषण अपघात झाला आहे.

सदरच्या अपघाताचे सविस्तर वृत्त असे की रात्रपाळी करून भरत ठाकूर केळवणे, भोम येथील सचीन म्हात्रे आणि आकाश चौगुले हे तिघे रिक्षातून घरी येत असताना पी यु बी येथे आले असता समोरून येणाऱ्या भरधाव ट्रेलर ने रिक्षास जोरदार धडक दिली यामध्ये भरत ठाकूर जाग्यावरच मयत झाले तर सचीन म्हात्रे, आकाश चौगुले यांस गंभीर मार लागला आहे. सदरचा अपघात पोलीस मित्र संघटनेचे अध्यक्ष अनिकेत वसंत तांडेल हे ड्युटीवर जात असताना त्यांनी प्रत्यक्ष पाहीला व त्यांनी त्यांच्या संपर्कातील न्हावा शेवा पोलिस स्टेशनचे पी एस आय दिपक दाभाडे यांना संपर्क साधला असता त्यांनी पोलीस व अँब्युलन्स पाठवतो असे सांगितले. यावेळी डीपी वल्ड ची रुग्णवाहिका येऊन अपघात ग्रस्त तिनही व्यक्तींना जे एन पीए हॉस्पिटलमध्ये नेण्यात आले यावेळी भरत ठाकूर हे मयत झाल्याचे सांगण्यात आले. सचीन म्हात्रे व आकाश चौगुले यांना पुढील उपचारासाठी वाशी येथील एम जी एम रुग्णालयात हलविण्यात आले आहे असे समजते.

# जिद्द, चिकाटी आणि मेहनतीने गरीब कुटुंबातील तांड्यावरचा मुलगा झाला झडख....

**गेवराई/प्रतिनिधी**
गेवराई तालुक्याचे भूमिपुत्र, पाचेगाव पंचक्रोशीतून अत्यंत गरीब कुटुंबातून ,आई-वडिलांची परिस्थिती बेताची अशा परिस्थितीतही जिद्द ,चिकाटी आणि मेहनतीच्या जोरावर यश खेचून आणणारा बंजारा समाजाचा जयराम तांड्याचा हिरा महाराष्ट्र लोकसेवा आयोगामध्ये पोलीस उपनिरीक्षक (PSI) या पदासाठी निवड झाली असून ,चिरंजीव राहुल शेषेराव राठोड यांचे समस्त बंजारा समाज बीड जिल्हा यांच्यावतीने कौतिक व अभिनंदन...करण्यात आले. तसेच आपल्या पोटाला चिमटा घेऊन आपल्या पाल्याला शिक्षणासाठी प्रेरित करणारे सर्वगुणसंपन्न आदर्श मातापिता श्री शेषराव राठोड व त्यांच्या पत्नी यांचे सुद्धा कौतुक खूप करण्यात येत आहे . प्रशासनाच्या सेवेमध्ये आपण आपला अनमोल हिरा समाजाच्या सेवेसाठी दिल्याबद्दल बंजारा समाजाला आपला सार्थ अभिमान आहे..... सध्याच्या तरुण पिढीला आदर्श वाटावा असा यश संपादन चिरंजीव राहुल यांनी केले आहे.... युवा पिढीने व्यसनाची नशा न करता शिक्षणाची नशा केल्यास निश्चितच यश मिळते हे राहुलने दाखवून दिले आहे.....



युवा पिढीने आई-वडिलांच्या परिस्थितीचा विचार करून चिरंजीव राहुल दादा सारखे अभ्यास करून प्रशासकीय सेवेमध्ये मोठे यश मिळू शकते हे आज सिद्ध झाले आहे....

सध्याच्या काळामध्ये शिक्षणच हे असे साधन आहे की, आपण आपल्या पिढीचे व उद्याच्या पिढीचा विकास करू शकतो....

त्यासाठी प्रत्येकाने शिक्षणाची कास धरली पाहिजे.. ग्रामीण भागातील परिस्थिती पाहता आपल्या पाल्यांना चांगल्या दर्जाचे शिक्षण देऊन, त्याबरोबर संस्कार पण चांगले देणे गरजेचे आहे .....यासाठी गावातील सर्व सुजान नागरिकांनी लक्ष देऊन ज्या ठिकाणी ज्ञान मिळते अशा शाळेचे वेगवेगळे साहित्य, पुस्तके देऊन विद्यार्थी व नागरिकांच्या ज्ञानात भर पडेल त्यातून सामाजिक ,शैक्षणिक, आर्थिक, राजकीय विकास कसा होईल.... याकडे लक्ष द्यावे . आयुष्यातील सगळ्यात मोठा आनंद आज राहुलच्या आई-वडिलांना झाला असेल कारण श्री शेषराव राठोड हा गरिबीतला माणूस आपुलकी, जिव्हाळा आणि प्रेमाने वागणारा नियतीने आज त्याला PSI चा बाप होण्याची संधी दिली... अशी संधी समाजाच्या प्रत्येक बापाच्या वाट्याला वेगवेगळ्या पदाच्या माध्यमातून येवो.. अशी अपेक्षा त्यांनी आपले मनोगत व्यक्त करताना दिली आहे.

# शेतक-याच्या मुलीची पोलीस उपनिरीक्षक पदाला गवसणी पहिल्याच प्रयत्नात महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत यश

**पैठण/चैताली औटी**
तालुक्यातील वाहेगाव येथील पूनम बोबडे या शेतकऱ्याच्या मुलीची पोलीस उपनिरीक्षक पदी निवड झाली आहे .ह्या यशाबद्दल तिचा व कुटुंबीयांचा रेणुकादेवी शरद सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन विलास बापू भुमरे यांच्या हस्ते आज सत्कार करण्यात आला. याप्रसंगी भुमरे म्हणाले, की ग्रामीण भागातील पुनम बोबडेने पहिल्याच प्रयत्नात महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कठीण परीक्षेत यश संपादन केले.तिचा आदर्श नक्कीच इतरांनी घेऊन यश संपादन करावे.



यावेळी खरेदी विक्री संघाचे संचालक अंकुश बोबडे पाटील, चेअरमन अर्जुन बोबडे, ग्रामविकास अधिकारी सागर डोईफोडे,नवगावचे सरपंच किशोर चौधरी, माजी नगराध्यक्ष शहादेव लोहारे ,कृष्णा बोबडे ,चंद्रभान जगताप ,यशवंत नरवडे, परमेश्वर बोबडे, रामेश्वर बोबडे, शिवाजी बोबडे, भगवान सोनवणे, संतोष सोनवणे, संदीपान शिंदे, कल्याण बोबडे ,सुभाष शेळके, माणिक मिसाळ, उपसरपंच राजू मोहिते उपस्थित होते.

# मानसी महिला पतसंस्था दीपस्तंभ पुरस्काराने सन्मानित



**पैठण/चैताली औटी** मानसी महिला नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित छत्रपती संभाजीनगर या संस्थेला महाराष्ट्र राज्य पतसंस्था फेडरेशनच्या वतीने रामोजी फिल्म सिटी हैदराबाद येथील समारंभात मिलिंद कांबळे अध्यक्ष कॉसमॉस बँक,काकासाहेब कोयटे अध्यक्ष महाराष्ट्र राज्य पतसंस्था फेडरेशन यांच्या हस्ते दीपस्तंभ पुरस्कार २०२४ ने सन्मानित करण्यात आले.मानसी पतसंस्थेच्या वतीने मुख्य कार्यकारी अधिकारी देवेश इनामदार व शाखाधिकारी कृष्णनाथ मुळे यांनी स्वीकारला. छत्रपती संभाजीनगर जिल्हा कार्यक्षेत्र असलेल्या मानसी महिला पतसंस्थेला ५० कोटी गटातून सलग चौथ्या वर्षी हा राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त झाला आहे.मानसी महिला पतसंस्थेच्या अध्यक्षा सौ संगीता देवेंद्र इनामदार,उपाध्यक्ष अश्विनी गणेश मडके ,संचालिका सौ.रजनी शेवेतेकर, सौ.शीला तांबे, सौ सुनीता देवकर, सौ प्रणिता मुळे ,सौ राधिका कुलकर्णी, सौ अर्चना गीरवलकर,सौ आरती कावसानकर,सौ पार्वती दारुणकर, कु साक्षी बेतवार,सौ दक्षा श्रॉफ ,सौ रश्मी कडेठाणकर यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

# जो जमीन सरकारी है! वो जमीन हमारी है! वंचित चे सर्वजित बनसोडे यांनी दिली करचुंडी येथील गायरान धारकांच्या आंदोलनास भेट

**बीड प्रतिनिधी**
करचुंडी येथे गायरान धारक २० जुलैपासून गावामध्येच गायनाचा सातबारा मिळावा आंदोलन करत आहेत. या आंदोलनाची दखल घेत वंचित बहुजन आघाडीचे राज्य उपाध्यक्ष तथा प्रखड वक्ते करचुडी येथे भेट दिली. करचुंडी येथे वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रकाश आंबेडकर हे भेट देणार होते परंतु आरक्षण बचाव यात्रेनिमित्त जिल्हा दौरा व्यस्त असल्यामुळे येऊ शकले नाही. त्यामुळे राज्याचे उपाध्यक्ष सर्वजीत बनसोडे यांनी या आंदोलनकर्त्यांची गावात जाऊन भेट घेतली. याप्रसंगी त्यांच्यासोबत वंचित बहुजन आघाडीचे नेते निरीक्षक डॉ.नितीन सोनवणे, जिल्हा सहसचिव पुरुषोत्तम (गोटू) वीर, युवक जिल्हा महासचिव ॲड. राजेंद्र कोरडे, आंदोलन संयोजक जयसिंग वीर हे उपस्थित होते.
याप्रसंगी मार्गदर्शन करताना सर्वजित बनसोडे म्हणाले की सरकारी है वो जमीन हमारी है, एका वक्तव्याचा संदर्भात त्यांनी गायरान जमीन आंदोलनात सहभागी असलेल्या सर्व गावकऱ्यांना सविस्तरपणे मार्गदर्शन केले, जोपर्यंत गायरान धारकांचा सातबारा त्यांच्या नावे होत नाही तो पर्यंत वंचित बहुजन आघाडी आपल्या पाठीशी खंबीरपणे उभा आहे असे त्यांनी सांगितले. १९६५ पासूनचा हा लढा गायरान जमीन कसणारी



लढत आहेत. अद्यापही शासनाने या आंदोलन प्रकल घेतली नाही. ना नामदार, ना खासदार, ना आमदार यांनी देखील भेट दिली नाही. या प्रश्नावर तोडगा करण्यासाठी आपण लवकरच वरिष्ठ पातळी प्रयत्न करू असं त्यांनी सांगितले यावेळी गावातील सर्व गायरानधारक त्यांचे कुटुंबीय व गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आंबेडकरी चळवळीतील बांडगुळ पहिले: प्रकाश आंबेडकर यांचा कुणावर हल्लाबोल?

**शरद पवार म्हणले की, महाराष्ट्राचे मणिपूर होईल. एकीकडे मराठा तर दुसरीकडे ओबीसी आहेत, असं वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर म्हणाले.**



### जरांगेंच्या मागणीला पाठिंबा नव्हताच

जरांगे पाटील यांना जेव्हा मी भेटलो तेव्हाही त्यांच्या मागणीला माझा पाठिंबा नव्हता आणि आजही नाही. मी तेव्हाही सांगत होतो की, तुम्ही ज्या पद्धतीने आरक्षण मागत आहात त्या पद्धतीने मिळणारच नाही. मराठा आरक्षणाचा प्रश्न मंडल आयोगामध्ये आला होता तेव्हा मराठा समाजातील जो वर्ग होता तो फरक करायला तयार नव्हता. जरांगे पाटील यांना निवडणुकीत भाग घेऊद्या. ती चांगली गोष्ट असेल महाराष्ट्र 169 कुटुंबातून मुक्त होईल असे ॲड. आंबेडकरांनी नमूद केले.

### 100 ओबीसी आमदार निवडून आणा

आपल्याला इथून पुढे लढाई जिंकायची असेल, तर आपल्याला 100 ओबीसी आमदार निवडून आणावे लागतील. आरक्षणाच्या संदर्भात राजकीय पक्षांनी भूमिका न घेतल्याने समाजानेच भूमिका घेतल्या आहेत. आरक्षणाच्या संदर्भात राजकीय पक्षांनी भूमिका घेतली असती तर गावागावांतील समाजात फूट पडली नसती. मी खात्रीने सांगतो की, जरांगे पाटील यांनी जरी म्हटलं की, मी निवडणूक लढतो तरी हे राजकीयच भांडण असेल, सामाजिक होणार नाही, असं आंबेडकर म्हणाले.

**विशेष /प्रतिनिधि**

आम्ही ज्यावेळी ही यात्रा काढली त्यावेळी बरीच नावे ठेवली गेली. स्वतःला काहीसुचत नाही म्हणून दुसऱ्यावर टीका केली जाते हे मी गेली 40 वर्ष बघत आहे. यामध्ये आंबेडकरी चळवळीतील बांडगुळ सर्वात आघाडीवर असतात हे लक्षात घ्या. ही बांडगुळं पाकिटछाप बांडगुळं आहेत, अशी टीका वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांनी केली. छत्रपती संभाजीनगर येथील आमखास मैदानावर आरक्षण बचाव यात्रेचा समारोप करण्यात आला. यावेळी त्यांनी जनतेशी संवाद साधताना ही टीका केली. आरक्षण हा सामाजिक प्रश्न आहे त्याला राजकीय वळण लागू नये. यासाठी आम्ही आधीपासून प्रयत्न करत होतो. ही आरक्षण बचाव यात्रा जेव्हा नियोजित केली, ती पक्ष म्हणून नाही तर सामाजिक जबाबदारी म्हणून राहिली पाहिजे, त्याला राजकीय वळण देऊ नका, असे आवाहन वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी केले.

हेच आरक्षणाचे फलित

या आरक्षण बचाव यात्रेचे फलित काय असेल, तर छगन भुजबळ म्हणाल्याप्रमाणे 1977 ची परिस्थिती आणि शरद पवार म्हणाल्याप्रमाणे मणिपूरसारखी परिस्थिती इथे होऊ शकत नसल्याचेही आंबेडकर यांनी सांगितलं.

## अनुसूचित जातींचे उप वर्गीकरण निर्णया विरोधात २१ ऑगस्ट भारत बंद मध्ये महाविकास आघाडीने उतरावे

## आंबेडकरवादी नेत्यांचे आवाहन

**मुंबई प्रतिनिधी**

उप वर्गीकरण करण्याच्या नावाखाली अनुसुचित जातींचे विभाजन केले जात आहे. त्याविरोधात येत्या २१ ऑगस्ट २०२४ रोजी दलित मागासवर्गियांच्या संघटना ' भारत बंद' पाळणार आहेत. राज्यातील महाविकास आघाडीने त्या बंद मध्ये उतरावे. त्यातून संविधानाशी बांधिलकी आणि अनुसूचित जातींबाबत असलेला कळवळा खरा असल्याची प्रचिती द्यावी, असे आवाहन आंबेडकरवादी भारत मिशन तर्फे एका पत्रकार परिषदेतून आज बहुजन रिपब्लिकन सोशलिस्ट पार्टीचे नेते, घटना तज्ज्ञ डॉ. सुरेश माने यांनी आज केले. यावेळी दलित पँथरचे नेते सुरेश केदारे, चर्मकार नेते अच्युत भोईटे, विचारवंत प्रशांत रूपवते, शिक्षण तज्ज्ञ डॉ. जी के डोंगरगावकर, आंबेडकरवादी भारत मिशनचे संयोजक, ज्येष्ठ पत्रकार दिवाकर शेजवळ आणि सतीश डोंगरे हे उपस्थित होते.

---

## बीडचे पोलिस अधीक्षक नंदकुमार ठाकूर यांची बदली अविनाश बारगळ नवे पोलिस अधीक्षक

**(बीड-विवेक कुचेकर)**

बीड जिल्ह्यात होत असलेल्या घटना आणि सध्या सुरू असलेली विधानसभा निवडणुकीच तयारी याच अनुषंगाने प्रशासकीय बदल्या सुरू झाल्या असून पोलीस अधिक्षक नंदकुमार ठाकूर यांची बदली झाली असून त्यांच्या जागी अविनाश बारगळ अमरावती येथून येत आहेत. अविनाश बारगळ यांनी अतिरिक्त पोलिस अधिक्षक त्यानंतर पोलिस उपायुक्त म्हणून अमरावती शहरात त्यांनी कार्यकाळ उपभोगल्यानंतर



अमरावती पोलीस अधिक्षक आणि नंतर पुन्हा अमरावतीमध्येच सीआयडीचे अधीक्षक म्हणून गृहविभागाने त्यांना काम करण्याची संधी दिली होती. एकाच शहरात चार वेळा पोलीस दलात वेगवेगळ्या पदावर काम करणारे अधिकारी म्हणून बारगळ यांची राज्यात मोठी चर्चा झाली होती.आता ते अमरावतीच्या सीआयडी विभागातून बीडला पोलीस अधिक्षक म्हणून येतं आहेत. एक चांगला आणि शिस्तप्रिय अधिकारी म्हणून त्यांची ओळख आहे. बीडमध्ये नंदकुमार ठाकूर यांनी दोन वर्ष सेवा बजावल्यानंतर विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने त्यांची बदली करण्यात आली आहे. त्यांच्या जागी अविनाश बारगळ बीडला येतं आहेत.बारगळ यांनी अमरवतीमध्ये चार वेळा पोलीस विभागात सेवा बजावली आहे.

## बीड बुंदेलपुरा मस्जिद मध्ये हल्ला! नागरिकांचा एसपी कार्यालयावर मोर्चा

**(बीड-विवेक कुचेकर)**

शहरातील बुंदेलपुरा भागात असलेल्या मस्जिद मध्ये नमाज साठी जाणाऱ्या तिघांवर आठ ते दहा जणांनी काठ्या, कुऱ्हाडी, तलवार आणि चाकूने हल्ला केला. यामध्ये दोघांची प्रकृती गंभीर आहे. पवित्र मस्जिद मध्ये घुसून हल्ला करण्याच्या प्रकाराचा मुस्लिम समाजाने निषेध केला आहे. आरोपीना तातडीने अटक करण्याची मागणी होत आहे. पेठ बीड भागातील महेबूब खान आणि जमील गुत्तेदार यांचे गेल्या अनेक दिवसापासून भांडण सुरु होते. महेबूब खान याच्या मुलाने मंगळवारी दुपारी अडीच तीन वाजण्याच्या सुमारास जमील गुत्तेदार हा आपल्या भावासह नमाज साठी मस्जिद मध्ये जातं होता त्याच्यावर हल्ला केला. नमाज सुरु असताना हा प्रकार झाल्याने उपस्थित लोक तातडीने धावले, त्यानंतर आरोपी फरार झाले. या घटनेत जमील गुत्तेदार व इतर दोघे गंभीर जखमी झाले. त्यांना जिल्हा रुग्णालयात दाखल केले आहे. दरम्यान पवित्र अशा मस्जिद मध्ये नमाज सुरु असताना घुसून तलवार, चाकू, लाठ्या काठ्या चा वापर करून या पवित्र स्थळाला बदनाम करणाऱ्या आरोपीना तातडीने अटक करा अशी मागणी समाजातील नागरिकांनी पोलिसांकडे केली आहे.



आरक्षण बचाव यात्रेत मंडल विजय दिनानिमित्त छत्रपती संभाजी नगर येथे वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय नेते प्रकाश आंबेडकर संबोधित करताना समोर अथांग जण समुदाय..

## गजानन खामकर हेच माजलगाव चे भावी आमदार.

**माजलगाव प्रतिनिधी..**

माजलगाव तालुक्यातील नागडगाव चे माजी सरपंच व धडाडीचे ओबीसी नेता म्हणून ओळख असलेले गजानन खामकर यांची माजलगाव मतदार संघात सध्या विधानसभेसाठी जोरदार चर्चा चालू असून असे सर्वसामान्य नागरिकांतून बोलले जात आहे व प्रस्थापितासाठी नव्हे तर लोकशाहीत सर्वांना मुभा असते. याचे भान प्रस्थापितांना राहिले नाही. राजकीय मक्तेदारी मोडीत काढावी लागेल गेल्या लोकसभेत निवडणुकीत संधी हुकली ती आता हुकु द्यायची नाही. संधी दार ठोठावत असते हे सत्य असले तरी आज स्पर्धेच्या युगात तर दार तोडून संधी मिळवावी लागते. प्रसंगी घुसखोरावर मात करून गरुड भरारी घ्यावी लागते. माजलगाव मतदार संघाचा पल्ला गाठण्यासाठी गजानन खामकर यांची पुरेपूर तयारी झाली आहे. हट्ट करणं वाईट असतं पण कांही वेळी कांही हट्ट गुणकारी ठरतात. राजकीय दिशा ओळखून दूर दृष्टीने निर्णय घेऊन सकारात्मक पाऊल उचलण्याच्या निष्ठांतपणा त्यांच्या व्यक्तिमत्वात आहे. लोकांना गृहीत धरून एकाधिकारशाहीच राजकारण करणाऱ्यांना शह देत लोकांच्या मनातले प्रश्न ओळखुन लोक भावना हाताळून निर्णय घेत लक्ष गाठण्यासाठी वाटचाल चालू आहे. निस्वार्थ भावनेतून कर्तव्य निभावत जन प्रेम उभा केल आहे. जनसेवा आणि थेट संपर्क ही अत्यंत साधी रणनिती ठेवून कायम जनतेची नाळ जोडली आहे. समस्या निर्मूलनासाठी यश अपयशाची परवा न करता लोकशाही मार्गाने संघर्ष चालू आहे. समाजकारण आणि राजकारणाच्या माध्यमातून केलेली सेवा वेळोवेळी साधलेला संवाद व संपर्क यामुळे निर्माण झालेली लोकशक्ती प्रचलित प्रस्थापितांना गारद करण्यासाठी माजलगाव सज्ज आहे. राजकीय मक्तेदारी व दहशतीखाली दबलेला काही मतदार वर्ग खुल्या मनाने बोलत नसला तरी निवडणुकीच्या रणधूमाळीत भय मुक्तीसाठी गजानन खामकर यांना बिनधास्त मतदान करेल. आज. घडीची राजकीय परिस्थिती लक्षात घेता गजानन खामकर हेच ओबीसी चे माजलगाव विधानसभेचे भावी उमेदवार असतील



हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077